नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 01/06/2021 (मंगळवार)
(सकाळ)

---

## मोबाईल टॉवर मधील DUR/RUS Cards व कॉपर वायर चोरी करणाऱ्या आरोपींना स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणचे पथकाने केले जेरबंद.

नागपूर ग्रामीण जिल्हयांतर्गत विवीध पोलीस स्टेशनला मोबाईल टॉवर मध्ये लावण्यात येणारे DUR/RUS Cards व कॉपर वायर चोरीच्या वाढत्या घटनेमुळे मोबाईल टॉवर्सला लक्ष करुन टॉवरचे साहीत्याची चोरी करणाऱ्या गुन्हेगारांचा स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस पथक कसोशीने शोध घेत होते. अश्यातच दि. 01/06/2021 रोजी मिळून आलेल्या गोपनिय माहितीच्या आधारे आरोपी नामे शुभम खराबे आणि कार्तिक खुरंगे यास त्यांचे सिध्देश्वर नगर, चिखली येथील घरी चोरीच्या मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले.

आरोपी 1) शुभम वसंता खराबे, वय 27 वर्ष, रा. डोंगरगांव तह. मोहाडी जि. भंडारा आणि आरोपी 2) कार्तिक नरेश खुरंगे, वय 21 वर्ष, रा. प्लॉट नं. 8, सर्वज्ञ सोसायटी, हुडकेश्वर रोड, नागपूर हे हाती लागले. उपरोक्त आरोपीतांना ताब्यात घेवून गुन्हया संबधाने विचारपुस केली असता शुभम खराबे याने सांगीतले की, मागील 2 ते 3 महिण्यामध्ये त्यांनी नागपूर ग्रामीण भागातील काटोल येथील झिल्पा, पारडसिंगा या गावातील आणि मौदा परिसरातील भुगांव व सावळी फाटा येथील मोबाईल टॉवरचे कॉपर तार व DRU Cards आणि RUS Cards चोरी केल्याचे सांगीतले. सदर चोरी केलेले साहीत्य त्यांनी श्री रामकृष्ण सहारे यांचे घराचे बाहेरील जिन्याचे खाली ठेवले आहे व ते दोघेही सदर साहीत्य विक्री करुन त्याची विल्हेवाट लावणार होते अशी माहिती देवून लपवून ठेवेलेले साहीत्य शुभम खराबे याने काढून दिले. आरोपीकडून मिळालेल्या साहीत्याची तपासणी केली असता पो.स्टे. काटोल आणि पो.स्टे. मौदा येथे नोंद असलेले एकुण 4 गुन्हे उघडकीस आले. वरील आरोपीतांचे ताब्यातुन एकुण 7 नग DRU/RUS Cards आणि 15 किलोग्रॅम कॉपर तार असा एकुण 1,37,500/– रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे आदेशाने सहा. पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, जितेन्द्र वैरागडे, पोलीस हवालदार नाना राऊत, पोलीस नायक दिनेश आधापूरे, पोलीस शिपाई अमोल वाघ, विपीन गायधने, रोहण डाखोरे, महिला पोलीस नायक नम्रता बघेल सायबर सेलचे पोलीस उपनिरीक्षक जावेद शेख व पोशि सतिष राठोड तसेच चालक पोलीस नायक अमोल कुथे यांचे पथकाने केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर